*Indian Streams Reserach Journal*
*Vol.1,Issue.XI/Dec; 11pp.1-4*

**ISSN:-2230-7850**

**Research Papers**

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अर्थशास्त्र या विषयातील पीएच.डी. पदवीसाठी प्रस्तुत संशोधन आराखडा 'परभणी जिल्हयातील बालमजुरीचा चिकित्सक अभ्यास'

प्रा. डॉ.एन.एन. मुंढे
प्रपाठक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
संत गाडगे महाराज महाविद्यालय
लोहा जि. नांदेड.

प्रा. राहुल धुमाळ
सहायक प्रध्यापक अर्थशास्त्र विभाग
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय
बारामती जि. पुणे.

## प्रस्तावना :-

जागतिकीकरणाच्या प्रकियेत नफावादाची संकल्पना पुढे येत आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रामध्ये स्पर्धा वाढून गळतीच्या तत्वाला सुरवात झाली आहे. म्हणूनच समाजात विषमतेची व असमानतेची दरी रूदांवत चालली आहे. त्यामुळे समाजात बेकारी दारिद्रय व शोषन अशा अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्यातूनच सर्व जगामध्ये बालमजुरीची समस्या निर्माण झाली ाहे.

**विषय निवडीचे कारण ः**

सध्या बालमजुतरीने एवढे उग्र रूप धारण केले आहे की त्यामुळे अनेक बालकांचे जीवन धोक्यात आले आहे. अनेक बालके दमा टी.बी. कॅन्सर अशा भयानक रोगाना धोक्याच्या व्यवसायात काम केल्यामुळे बळी जात आहेत.

भविष्यकालीन विकासातील एक अडथळा म्हणून बालमजुरीच्या समस्येचा विचार करता येतो. कारम मुलांच्यातील प्रचंड बुद्धीमत्तेचे मातेरे बालमजुरीने होत असते. देशाचे भावी सुजान नागरिक बबने आणि लोकशाही जीवन पद्धतीत समर्थपणे उभे राहण्याच्या प्रकियेतील बालमजुरी हा एक अडथळा आहे. तेव्हा या समस्येचे स्वरूप कारणे परिणाम तपासण्यासाठी तसेच ही समस्या सोडवण्याच्या दृष्टीने उपाय सुचविण्यासाठी हा विषय निवडला आहे.

**क्षेत्र निवडीचे कारम ः**

अभ्यासासाठी मराठवाडयातील परभणी जिल्हा निवडला आहे. याचे प्रमुख कारम म्हणजे **2002** मध्ये महाराष्ट्र शासनाने मानव विकास अहवाल **2002** हा महत्वाचा अहवाल प्रसिध्द केला आहे. यात **35** जिल्हयाचे मानव विकास निर्देशांक दिले आहेत. राज्याचा सरासरी मानव विकास निर्देशांक ह्यञ्डीह्र **0.58** असून मराठवाडयातील आठही जिल्हे या पातळीच्या खाली आहेत.

**मानव विकास निर्देशांकात मराठवाडा ः**

या अहवालानुसार मराठवाडयातील आठ जिल्हयाचे मानव विकास्का निर्देशांक पुढील प्रमाणे

औरंगाबादर्ं **0.57** लातुरर्ं **0.47** बीडर्ं **0.47** परभणीर्ं **0.43** हिंगोर्ली **.43** उस्मानाबार्द **0.38** नांदेर्ड **0.37** जालनार्ं **0.27**

यावरून मराठवाडा अजुनही दरडोई उत्पन्न शिक्षण आरोग्य या तिन्ही क्षेत्रात वराच मागे आहे. विशेष म्हणजे **10** पैकी **9** उच्च मानवी विकास जिल्हे पश्चिम महाराष्ट्रातील आहेत. याचाच अर्थ विभागीय विकासात फार मोठा असमतोल निर्माण झाला आहे. त्यामुळेच बालमजुरीच्या अभ्यासासाठी परभणी जिल्हा निवडला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे ः** (Objectives of Study)

या अभ्यासाचे प्रमुख उेद्दष्टे म्हणजे बालमजुरांचा सामाजिक व आर्थिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे हा आहे या अनुषंगाने अभ्यासाची काही प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे.

**1**. जातीनिहाय बालकामगारांचा अभ्यास करणे.
**2**. बालकामगारांच्या कुंटुबीयाच्या सामाजिक दर्जाचा अभ्यास करणे.
**3**. बालकामगारांच्या कुंटुबीयांना मिळर्णाया नागरी सुविधाचा अभ्यास करणे.
**4**. बालमजुर व त्यांचे पालक यांच्या शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
**5**. विविध क्षेत्रातील बालकामगारांचा अभ्यास करणे.
**6**. बालकामगारांच्या कुंटुबीयांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
**7**. बालकामगारांचा वेतनदार तसेच त्यांच्या कुंटुबीयांची बचत कर्ज इ. आर्थिक घटकांचा अभ्यास करणे.

**गृहित कृत्ये ः** (Assumptions)

बालमजुरीच्या अभ्यासासाठी खालील गृहीतकृत्ये विचारात घेतली

ाहेत .

1 . समाजामध्ये बालमजुरांना मुल्यहीन व दर्जारहीत जीवन जगावे लागते .

2 . बालमजुरांना दररोज 15 ते 20 रू . वेतनदरावर काम करावे लागते .

3 . बालमजुरांना दररोज 10 ते 12 तास काम करावे लागते .

4 . बालमजुरांच्या कुंटुबीयांची आर्थिक परिस्थिती अंत्यत हालाकीची आहे .

5 . बालमजुर व त्यांचे पालक अशिक्षीत आहेत .

6 . धोकादाय उद्योगात काल केल्यामुळे अनेक बालकांना आपल्या प्राणास मुकावे लागत आहे .

7 . बालमजुरीच्या बाबतीत जेवढी समाज जागृती व्हायला पाहिजे तेवढी झालेली नाही .

**परिकल्पना ः** (Hypothesis)

बालमजुरीच्या अभ्यासासाठी खालील परिकल्पना तपासण्यासाठी विचारात घेतल्या आहेत .

1 . गलिच्छ वस्ती खालावलेला आर्थिक दर्जा आणि बालमजुरी यांचा जवळचा सहसंबंध आहे .

2 . वाढता वेतन दर आणि बालमजुरांचा पुरवठा यांचा समसंबध आहे .

3 . निरक्षमता आणि बालमजुरी यांचा निकटचा सहसंबंध आहे . इ .

तथ्य संकलनाची पध्दत ः (method of data collection)

नमुना निवडीचा आधार ः अभ्यासाठी परभणी जिल्हयातील 9 तालुक्यातील ह्यगंगाखेड़ पालम़ सोनपेठ़ पुर्णा सेलु मानवत़ परभणी पाथ्री जिंतुरह्व विविध खेडयांचा व शहराचा अभ्यास विशिष्ट कालमर्यादेपुरता केला जाणार आहे हा अभ्यास करताना प्रत्येक तालुक्यतील 10 खेडे यादृच्छिक पद्धतीने निवडण्यात येतील .

तसेच प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणावरून 45 कुंटुव व प्रत्येक तालुक्यातील 10 खेडयात प्रत्येकी 09 कुंटुव निवडले जातील . ही कुंटुव निवडताना स्तरीत नमुना निवड पदधतीचा आधार घेतला आहे . अभ्यासासाठी बालकामगारांच्या कुंटुबीयांच्या वार्षिक उत्पन्नाचे तीन गट पाडले आहेत . व प्रत्येक गटातून शहराच्या ठिकाणावरून 15 कुंटुव तर खेडयात प्रत्येक गटातून 3 कुंटुव निवडले जातील .

निवडलेल्या कुंटुबीयांकडून प्रश्नावली भरून घेतली जातील . त्यामध्ये विषयाच्या उद्दिष्टानुसार प्रश्न विचारले जातील व त्याचे वर्गीकरण करून विश्लेषण केले जातील .

**संशोधन आराखडा ः** (Research Design)

परभणी जिल्हयातील बालमजुरीचा अभ्यास पुढील प्रकरणाद्वारे करण्यात येयील .

1 . परभणी जिल्हयाची अर्थव्यवस्था

2 . संशोधन पध्दती

3 . अभ्यासाचे सिंहावलोकन

4 . बालमजुरी निर्मुलनासाठी उचललेली पावले .

5 . बालमजुर ः हक्क संहिता व कायदे

6 . परभणी जिल्हयातील बालमजुरीची प्रवृत्ती

7 . परभणी जिल्हयातील बालमजुरीचे कारणे परिणाम व उपाय

8 . निष्कर्ष व शिफारशी

**अभ्यासाचे महत्व ः** (significance of Study)

या अभ्यासाचे महत्व प्रमुख्याने शिक्षक़ विद्यार्थी उद्योजक़ विविध अधिकारी़ पोलीस यंत्रणा न्यायालय़ विविध सामाजिक संस्था़ सरकाऱ मानवी हक्क आयोग़ युनिसेफ़ WHO इत्यादी घटकांना बालमजुरांची परिस्थिती जाणून घेण्यासाठी होणार आहे .

**अभ्यासाच्या मर्यादा ः** (Limitations of Study)

हा अभ्यास फक्त परभणी जिल्हयातील असल्यामुळे अभ्यासावर प्रादर्शिक मर्यादा पडणार आहेत . तरीपण अभ्यासाचे युनीट लहान असल्यामुळे अभ्यासाला न्याय मिळणार आहे .

**संदर्भसूची ः**

1 . manas Dasgupta (2007) 'Research methodlogy in Economics' Deep and Deep publications new Delhi.

2 . दैनिक सकाळ दि . 1 . 5 . 2008 'महाराष्ट्र दिन व मराठवाडयाची प्रगती' महाराष्ट्र दिनानिमित्त राज्य नियोजन आयोगाचे सदस्य र . पू . कुरूलकर यांचा लेख पान नं . 6 .

3 . प्रा . राहुल धुमाळ (2008) 'गंगाखेड तालुक्यातील बालमजुरीच्या चिकित्सक अभ्यास' टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे . एम . फिल . पदवीसाठी सादर केलेला लघुशोध प्रबंध .